महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक – रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

सोमवार ■ 03 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 219 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



# पुण्याचा पृथ्वीराज मोहोळ ठरला यंदाचा महाराष्ट्र केसरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अहिल्यानगरमध्ये आज (२ फेब्रुवारी) महाराष्ट्र केसरी स्पर्धा पार पडली. या सामन्यात पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहळ यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरला आहे. पैलवान पृथ्वीराज मोहळने पैलवान महेंद्र गायकवाडवर मात करत महाराष्ट्र केसरी किताब पटकावला आहे. पैलवान पृथ्वीराज मोहोळने अंतिम फेरीत बाजी मारत ६७ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेची गदा पटकावली आहे.

पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहळ यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पैलवान पृथ्वीराज मोहळला चांदीची गदा आणि थार गाडी देण्यात आली आहे. पृथ्वीराज मोहळने महाराष्ट्र केसरीची गदा जिंकल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी मोठा जल्लोष केला.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेत गोंधळ, शिवराज राक्षेने पंचाला लाथ मारली?

अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मात्र, आज (२ फेब्रुवारी) या स्पर्धेच्या उपांत्य फेरीचा सामन्यात मोठा गोंधळ झाल्याचं पहायला मिळालं. महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अभूतपूर्व गोंधळ झाल्यामुळे स्पर्धेला गालबोट लागलं.उपांत्य फेरीचा सामन्यात पैलवान शिवराज राक्षेचा पराभव झाल्याचा निर्णय पंचांनी दिला. मात्र, पैलवान शिवराज राक्षेने पंचांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात नाराजी व्यक्त करत पंचाला लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला.

पैलवान पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यात उपांत्य फेरीचा कुस्तीचा सामना रंगला होता. मात्र, पैलवान पृथ्वीराज मोहोळकडून शिवराज राक्षे पराभूत झाला. पण पराभूत होताच शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे मैदानात काहीवेळ गोंधळाची परिस्थिती पाहायला मिळाली. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मध्यस्थी केल्याने वाद काहीसा निवाळला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील त्या ठिकाणी उपस्थित होते. हा गोंधळ झाल्यानंतर शिवराज राक्षेने या सामन्याचा रिव्ह्यू घेण्याची मागणी केली होती.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांसमोर राडा

अहिल्यानगरमध्ये 67 व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा उपांत्य सामना पार पडत असताना मोठा गोंधळ उडाल्याचं बघायला मिळत आहे. गादी विभागामधून नांदेडचा डबल महाराष्ट्र केसरी ठरलेला पैलवान शिवराज राक्षे विरुद्ध पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळ यांच्यात उपांत्य फेरीचा सामना पार पडत होता. दोघांमध्ये काँटेची टक्कर सुरु असताना शिवराज राक्षे याचा पराभव झाला. यानंतर शिवराज राक्षे याला इतका राग अनावर झाला की त्याने पंचांना लाथ मारली. यामुळे कार्यक्रमस्थळी मोठा गोंधळ उडाला. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे उपस्थित होते. त्यांच्यासमोर हा राडा झाला.

**"पंचांनी चुकीचा निर्णय दिला आहे. आम्हाला हा निर्णय मान्य नाही. तुम्ही रिप्ले बघा. प्रतिस्पर्ध्याने डाव केला असेल, प्रतिस्पर्धेचे दोन्ही खांदे टेकले असतील तर कुस्ती फोल होते. तुम्ही रिव्ह्यू बघा. माझे दोन्ही खांदे टेकले नाहीत. चॅलेंज टाकल्यावर निर्णय देता येत नाही. कुस्ती चित झाली असेल तरच तुम्हाला निर्णय देता येतो. अर्जंटमध्ये कुस्तीचा पुकार पंचांनी केला. मल्लाला दहा ते पंधरा मिनिटे तरी वेळ द्यायला पाहिजे. आम्हाला रिप्ले दाखवा, अशी आमची मागणी आहे", अशी प्रतिक्रिया शिवराज राक्षेने दिली.**

### माझ्या कुटूंबाचं स्वप्न पूर्ण झालं - पृथ्वीराज मोहोळ

अटीतटीच्या या लढतीमध्ये महेंद्र गायकवाड याने अचानकपणे मैदान सोडल्यामुळे पंचांनी पृथ्वीराज मोहोळ यांना विजयी घोषित केलं, मोहोळ यांना विजयी घोषित झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ राधाकृष्ण विखे पाटील आणि सभापती राम शिंदे यांचे हस्ते गदा देऊन मोहळ यांचा सन्मान करण्यात आला, महाराष्ट्र केसरी जिंकल्यानंतर माझ्या आजोबांचं वडिलांचं आणि माझं स्वप्न ही पूर्ण झाल्याची प्रतिक्रिया पृथ्वीराज मोहोळ यांनी दिली.

# वसंत पंचमीनिमित्त पंढरपुरात विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पंढरपूर : आजपर्यंत अनेक विवाह सोहळे झाले, होतील. पण जर देव देवतेचा विवाह असेल तर... असाच एक विवाह सोहळा वसंत पंचमीच्या मुहूर्तावर येथील श्री विठ्ठल रख्मिणीचा झाला, तोही शाही पद्धतीने. मंगल अक्षता, सनई चौघडे आणि उपस्थित वऱ्हाडी मंडळींच्या साक्षीने हा विवाह सोहळा पार पडला. वसंत पंचमी ते रंगपंचमीपर्यंत देवाला शुभ्र पोशाख करून मूर्तीवर गुलालाची उधळण करण्याची परंपरा आहे. त्यानुसार देवाला पांढरा शुभ्र पोशाख परिधान करण्यात आला. दरम्यान, या विवाह सोहळयासाठी भाविकांची गर्दी दिसून आली. वास्तविक पाहता शिशिर म्हणजे थंडी संपून वसंत म्हणजे उन्हाळा सुरू होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. वसंतच्या आगमनाने सर्व सृष्टी फुलून जाते. सर्वत्र चैतन्याचे वातावरण तयार होते. आजचा दिवस रती आणि कामदेवाच्या पूजेचा असल्याचे मानल जाते. वसंत ऋतूच्या आगमनाने सर्व सृष्टीमध्ये चैतन्य असल्याचे हे प्रतीक आहे. या ऋतुमध्ये पांढरे वस्त्र परिधान केले तर उन्हाची तीव्रता कमी होते. अशा पद्धतीने रूढी बरोबर विज्ञानाची जोड पूर्वीपासून होते. असे असले तरी वारकरी सांप्रदायात अनेक परंपरा आजही जपल्या जात आहेत.

## विठ्ठलाच्या रंगपंचमीस प्रारंभ

**वसंतपंचमीपासून ते रंगपंचमीपर्यंत विठ्ठलास पांढरा शुभ्र वेष परिधान करण्यात येत असतो. या काळात दररोज गुलालांची उधळण भगवंताच्या अंगावर केली जाते. वसंत पंचमीपासून ते रंगपंचमीपर्यंत म्हणजे एक महिना विठ्ठलाची रंगपंचमी सुरू राहणार. या रंगपंचमी उत्सवाचा शुभारंभ वसंतपचंमीच्या निमित्ताने झाला. सावळा विठूराया आणि रुक्मिनिमाता पांढऱ्या शुभ्र वेषात दिसणार आहे.**



# कल्याण तालुक्यातील पारेषण टॉवर लाईन बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्या - आमदार किसन कथोरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण कल्याण तालुक्यातुन पारेशन वीज कंपनीची टॉवर लाईन जात आहे. या तालुक्यातुन यापूर्वी हि अनेक वीज टॉवर गेल्याने शेतकरी हतबल झालेला आहे. या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊनच टॉवर लाईन चे काम करा अन्यथा पारेशान कंपनी विरुद्ध तीव्र आंदोलन करणार असल्याची माहिती आमदार किसन कथोरे यांनी दिली. तालुक्यातुन वसत, आपटी, मांजर्ली, वाहोली, रेवती, पिपंळोली, म्हस्कल, रुंदे, उतणे येथून पारेशान कंपनीच्या टॉवर जात आहेत यामुळे शेतकरी बाधित होतं असून या शेतकऱ्यांनी टॉवर लाईन विरोध केला आहे. उद्या शेतकऱ्यातील सामान्य शेतकऱ्यांनी राजराम चौधरी यांनी आमदार किसन कथोरे यांची भेट घेतली त्यावेळी पारेशान कंपनी च्या अधिकाऱ्यांशी बोलताना आमदार किसन कथोरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली यावेळी बाधित शेतकरी उपस्थित होते.

# मुरबाड मध्ये आदिवासी आश्रमशाळेत दहावीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या




सविस्तर वृत्त पान ४ वर

# जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना गावभेटी द्याव्या लागणार

## – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांना आठवड्याला गावभेटी द्याव्या लागणार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आदेश

शिर्डी दि. १- मंत्र्यांपाठोपाठ आता अधिकाऱ्यांनाही जनतेत जाऊन काम करावे लागणार आहे. जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी दर आठवड्याला गावभेटी देत शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

वेगवान कारभारासाठी महसूल विभागाकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. महसूल विभागाकडून ११ कलमी परिपत्रक जाहीर करण्यात आले असून या परिपत्रकातील ११ कलमी मुद्दे पुढील प्रमाणे सदर भेटी दरम्यान क्षेत्रीय कार्यालयांचे कामकाज यादृच्छिकरित्या व अचानक तंत्राचा वापर करुन तपासावे. सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या पार पडत आहे याची सकारात्मक खातरजमा करावी. यात केवळ औपचारिकता न ठेवता क्षेत्रीय यंत्रणेवर नियंत्रण राहील असे नियोजन करावे.

दौऱ्यामध्ये सकारात्मक फलित निघेल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. ग्रामपातळीवरील लोकांशी सुसंवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात व त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करावेत. संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची सर्वसामान्यांशी वागणूक सौजन्यपूर्ण व संवेदनशीलतेची आहे, याबाबत जनसंवादातून खात्री करावी. गावपातळीवरील तसेच इतर अधिकारी, कर्मचारी नियमानुसार कार्यक्षेत्रात राहून आपले कर्तव्य निभावत असल्याची खात्री करावी.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना जनतेत जाण्याबाबत जे परिपत्रक काढले आहे. त्यामुळे जनता व अधिकारी यांच्यात संवाद निर्माण होईल.

*- भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा संयोजक, भाजपा, सोशल मीडिया सेल, उत्तर नगर,*

गौण खनिज व महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी नाविन्यपुर्ण संकल्पना राबविणे. तसेच वाळू व गौण खनिज उत्पन्न तपासणी शासकीय धोरणानुसार अंमलबजावणी होत असल्याची खातरजमा क्षेत्रीय भेटी दरम्यान करावी.

क्षेत्रीय भेटी देवून नैसर्गिक आपत्तीप्रवण भागात भविष्यात आपत्ती कशी टाळता येईल याच्या उपाययोजना, भौगोलिक व स्थानिक परिस्थिती विचारात घेवून काय उपाययोजना करता येईल ? याबाबत वेळोवेळी त्या त्या मंत्रालयीन विभागास सुचित करुन जिल्हा, उपविभागीय तसेच तालुका पातळीवरील त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचित करुन कामे करुन घ्यावीत.

मुख्यमंत्री महोदयांनी १०० दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने महसुली विभागास दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असल्याचा वेळोवेळी आढावा घ्यावा. सर्व कार्यालयांमध्ये कामकाज प्राधान्याने e-Office प्रणालीमध्ये होत आहे का याची तपासणी करावी.

सेवा हक्क कायदा पोर्टल, आपले सरकार पोर्टल, पी.जी. पोर्टल, पी. एम. जी पोर्टल, e-mutation, ई-पिकपाणी, e.Qj court इत्यादी ऑनलाईन सुविधेमधील क्षेत्रीय कार्यालयाच्या कामकाजास अनुसरून निर्गतीचा आढावा घ्यावा. सेतु कार्यालयाची तपासणी करावी व आवश्यक त्या सुचना संबंधितांना कराव्यात.

कार्यालयांची तपासणी करत असताना कार्यालयीन इमारतीतील स्वच्छता, सुविधा इत्यादीची तपासणी करावी. कार्यालयाच्या समोर कार्यालयाचे नाव दर्शविणारे दर्शनीय व सुस्पष्ट नामफलक असल्याची तसेच नागरिकांची सनद, जनतेसाठी त्या कार्यालयामार्फत उपलब्ध होणाऱ्या सुविधा व संपर्क क्रमांक हे त्या-त्या कार्यालयासमोर लावण्यात आल्याची खात्री करावी.

### भारतीय राज्यघटनेमुळेच

# देशाची 'शक्तिशाली राष्ट्र' म्हणून ओळख

## – प्रा.राम शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जागतिक स्तरावर भारताने एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख प्राप्त केली आहे. आपल्या राज्यघटनेने त्यादृष्टीने भक्कम आधारशिला प्राप्त करून दिली असल्यानेच हे शक्य झाले. लोकशाही संस्था बळकट करणे,सकारात्मक सहभाग नोंदवून संसद आणि राज्य विधानमंडळे यांचे वैभव टिकवणे आणि त्यायोगे लोक कल्याणाच्या प्रति प्रतिबद्धता सुनिश्चित करणे हे, आपले कर्तव्य आपण चोखपणे बजावले पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले.लोकसभा अध्यक्ष श्री ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली येथे आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते बोलत होते. " भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे:घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळे यांचे योगदान" या विषयावर या परिषदेमध्ये विचारमंथन होत आहे.



आपले विचार व्यक्त करतांना सभापती प्रा.राम शिंदे पुढे म्हणाले,आपली राज्यघटना पुरेशी लवचिक असून ती दिनप्रतिदिन आणखी सामर्थ्य प्राप्त करीत आहे. आपल्या संसदीय लोकशाहीने राज्यघटनेच्या या शक्तिमुळेच समोर आलेल्या संकटांचा यशस्वी सामना केला.घटना दुरुस्तीच्या संदर्भात काहींनी हेतूता गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न केले मात्र अलीकडच्या निवडणुकांमध्ये जनतेने त्यांना नाकारून योग्य जनादेश दिला आहे.

"लोकशाहीत स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या तीन मूल्यांना अत्यंत महत्त्व आहे.एकाला सोडून दुसऱ्याचा विचार देखील करता येणार नाही.तसे झाल्यास लोकशाही संदर्भातील मूळ संकल्पनेलाच बाधा पोहोचेल..." या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना परिषदेसमोर दिलेल्या भाषणातील सावधानतेकडे सभापती प्रा.राम शिंदे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले आणि सर्वांनी या मुल्यांप्रती कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

सर्वसमावेशिता आणि सर्वांना समान संधीची उपलब्धता हे आपल्या राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्ट्य त्यांनी यावेळी अधोरेखित केले.कोणतीही राजकीय,आर्थिक अशी कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून पुढे आलेले आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी हे आपल्या उल्लेखनीय कार्यकर्तृत्वाच्या आधारावर तिसऱ्यांदा योगदान देत देशाला विकासाच्या वाटेवर पुढे नेत आहेत. हे स्वयंस्पष्ट उदाहरणच यासंदर्भात पुरेसे आहे असेही सभापती प्रा. राम शिंदे यावेळी म्हणाले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसदीय कारकीर्दीचा प्रारंभ तेव्हाच्या बॉम्बे लेजिस्लेटिव्ह काऊन्सिल सदस्यत्वापासून झाला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाद्वारे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्यांनी यावेळी कृतज्ञ स्मरण केले.

# तिसऱ्या स्फोटाच्या उंबरठ्यावर

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता काय करू शकते, याची चुणुक जगाला दिसू लागली आहे.या तंत्रज्ञानाचे 'गॉडफादर' म्हणवले जाणारे डॉ. जेफ्री हिंटन यांनी त्याविषयीची भीती व्यक्त केली आहे. 'एआय' काय आहे, ते विनाशक का होऊ शकते याविषयी...'कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी (एआय) मी जे काम केले, त्याबद्दल मला थोडा खेदच वाटतो,' हे उद्गार आहेत 'एआय' तंत्रज्ञानाचे 'गॉडफादर' असे बिरूद लाभलेले डॉ. जेफ्री हिंटन यांचे."एआय', त्या तंत्राच्या भयावह शक्यता यांविषयी बोलताना नोकरीमध्ये असताना मर्यादा येतील, म्हणून राजीनामा देत आहे,' असे त्यांनी 'गूगल' सोडताना सांगितले.मी याला 'तिसरा स्फोट' म्हणतो. सन १८९६च्या आसपास 'डायनामाइट'चा शोध लावणाऱ्या आल्फ्रेड नोबेलचा स्फोट पहिला. सन १९४५मध्ये 'मॅनहॅटन प्रोजेक्ट'मधील अणुबॉम्बचा शोध लावणारा ओपेनहाइमरचा स्फोट दुसरा. आल्फ्रेड नोबेलच्या भावाचे निधन झाल्यानंतर, आल्फ्रेडचेच निधन झाले आहे असे समजून एका वृत्तपत्राने 'मृत्यूच्या व्यापाऱ्याचे निधन' अशी बातमी छापली.आपण मेल्यावर जग आपल्याला कसे ओळखेल, आठवेल याविषयीची 'याची देही याची डोळा' जाणीव झाल्यानंतर उपरती झालेल्या आल्फ्रेडने, पापक्षालनासाठी 'नोबेल पारितोषिका'ची घोषणा केली.गंमत म्हणजे याच नोबेल पारितोषिकासाठी १९४६, १९५१, १९६७ असे तीन वेळा नामांकन मिळालेल्या; परंतु पुरस्कार मिळू न शकलेल्या रॉबर्ट ओपेनहाइमरने अणुबॉम्ब बनवला. त्याचा स्फोट 'डायनामाइट'पेक्षा कित्येक पट विध्वंसक होता. त्यानंतर त्या संशोधनाच्या विनाशक शक्तीमुळे, ओपेनहाइमरने खेद व्यक्त केला होता.आताचा डॉ. जेफ्री हिंटन यांचा राजीनामा आणि त्यानंतरची खेदयुक्त काळजी हा 'एआय' तंत्राच्या अजूनही अव्यक्त; पण नजीकच्या भविष्यातील महास्फोटाची जणू नांदीच!इतकी वर्षे 'गूगल'मध्ये कार्यरत असूनही, त्याने आत्ताच राजीनामा देण्याची मला तीन कारणे वाटतात. पहिले म्हणजे, 'एआय'मुळे नजिकच्या काळात जवळजवळ ६० ते ८० टक्के नोकऱ्या कमी होण्याचे भाकित वर्तविले जात आहे; त्यामुळे प्रचंड सामाजिक अस्थैर्य निर्माण होईल. दुसरे म्हणजे, अलीकडेच 'चॅट जीपीटी' आणि 'लार्ज लँग्वेज मॉडेल'ने (एलएलएम) घातलेला धुमाकूळ आणि तिसरे म्हणजे, या अत्यंत प्रगत 'एआय'मुळे तयार होत असलेल्या विध्वंसक शस्त्रांची भीती.'स्वार्म तंत्रज्ञान', म्हणजे अनेक छोटे ड्रोन एकत्रित काम करतात. एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र दिल्यास हे सारे छोटे ड्रोन एकत्र काम करून त्या व्यक्तीला ठार करू शकतात. या हल्ल्यातून बचाव होणे शक्य नाही. ही तिन्ही कारणे ज्या तंत्रज्ञानामुळे शक्य झाली, त्यात डॉ. हिंटन यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.'चॅट जीपीटी' आणि 'डीप फेक' तंत्रज्ञानासारख्या गोष्टींमुळे सोशल मीडियावर बनावट छायाचित्रे, व्हिडिओ, मजकूर यांचा अनिर्बंध सुळसुळाट होण्याची नुसती शक्यताच नव्हे, तर अनेक शास्त्रज्ञांना खात्री वाटते. हे अत्यंत प्रगत तंत्रज्ञान वाईट हेतू असणाऱ्या, आसुरी महत्त्वाकांक्षेने प्रेरीत लोकांच्या हाती पडल्यास जगाचा विनाश अटळ आहे, याबाबतही त्यांच्यात एकवाक्यता आहे.याच्याही पुढे जात, जगाचा विनाश 'होईल का', यापेक्षा 'कधी होईल' एवढेच विचारणे आपल्या हातात आहे, अशी भीतीही अनेक विचारवंत व्यक्त करीत आहेत. याच प्रकारची विधाने, काळजीयुक्त भाषणे अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन, ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक आणि प्रसिद्ध तंत्रज्ञ-उद्योजक इलॉन मस्क, बिल गेट्स करीत आहेत.आपण ती ऐकत, वाचत आहोत. व्हाइट हाउसने नुकतेच 'गूगल'चे सुंदर पिचाई आणि 'मायक्रोसॉफ्ट'चे सत्या नाडेला यांना 'एआय'चा जबाबदारीपूर्वक वापर व त्यासाठीचा आराखडा करणे यासंबंधी बोलावले होते. त्या बैठकीत 'ओपन एआय'च्या ('चॅट जीपीटी'ची जनक कंपनी) सॅम आल्टमनबरोबरच अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरिसही उपस्थित होत्या. 'विश्वासार्ह एआय'साठी व्हाइट हाउसने १४ कोटी डॉलर जाहीर केले आहेत. 'एआय'ची उपशाखा असणारी 'न्यूरल नेटवर्क' खूप जुनी आहे. 'न्यूरल नेटवर्क' अतिप्रगत करण्यात, तिचे २०१२मध्ये 'डीप लर्निंग'मध्ये रूपांतर करण्यात डॉ. हिंटन यांचे मोलाचे योगदान आहे. या 'डीप लर्निंग' प्रकारामुळे आज ही परिस्थिती ओढावली आहे. डॉ. हिंटन म्हणतात, की हे तंत्रज्ञान मानवापेक्षाही पुढे जाईल, अशी शक्यता आहे आणि ती भयावह आहे.काही दिवसांपूर्वी 'सॅमसंग' कंपनीने 'चॅट जीपीटी'च्या वापरावर बंदी घातली. वॉरन बफे या गुंतवणूक क्षेत्रातील अग्रेसर सीईओने तर 'एआय'ला 'दुसरा अणुबॉम्ब' म्हटले आहे. 'एआय' तंत्रज्ञानामुळे ६० ते ८० टक्के लोकांच्या हातचे काम जाईल, ते बेरोजगार होतील, याचा अनेक पाऊलखुणा दिसत आहेत.'रायटर्स गिल्ड' या अमेरिकेतील लेखकांच्या संघटनेने नुकत्याच काढलेल्या मोर्चाने हे दाखवून दिले. 'चॅट जीपीटी' कथा, पटकथा लिहून देणार असेल, तर लेखकांना कोण मानधन देणार?परवाचीच बातमी आहे, की ब्रिटनमध्ये गुंतवणूक तज्ज्ञांच्या सल्ल्यापेक्षा 'चॅट जीपीटी'ने गुंतवणुकीवर अधिक परतावा दिला. 'सोनी'च्या छायाचित्र स्पर्धेत प्रथम पारितोषिक जाहीर झालेल्या जर्मन छायाचित्रकाराने ते नम्रपणे नाकारले; कारण ती 'एआय'ची कलाकृती होती.'एआय', 'बिग डेटा', 'क्लाउड' इत्यादींचा समुच्चय असणारी, २०१३मध्ये अस्तित्वात आलेली चौथी औद्योगिक क्रांती म्हणजेच 'इंडस्ट्री ४.०' किंवा 'आय ४'. याला मागे टाकत, दहा वर्षांत 'इंडस्ट्री ५.०' उदयाला आली आहे. यामध्ये मानव आणि यंत्र-तंत्र-रोबो एकत्र काम करतील. याला 'कोबॉट' म्हणतात. 'कोबॉट'मुळे जीवन सुखावह (की आळशी?) झाले, तरी असंख्य नोकऱ्यांवर गदा येऊन, सामाजिक अस्थैर्य वाढेल.प्रख्यात मानववंश शास्त्रज्ञ युवल हरारी ('सेपियन्स'चा लेखक) याने एका 'टेड टॉक'मध्ये म्हटले आहे, की ९० टक्के लोकांना भविष्यात काही कामच नसेल.यावर काहीसा उपाय म्हणून बिल गेट्स यांनी 'एआय एथिक्स ग्रुप' सुचवला आहे. त्यांनी असेही म्हटले आहे, की एखाद्या उद्योगाने लोकांना काढून रोबोंना काम दिले, तर त्यांना 'रोबो कर' लावण्यात यावा.'एआय'वरील संशोधन सहा महिने थांबवावे, असे अनेक तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, विचारवंत सुचवत आहेत. तंत्रज्ञानाने केलेली कलाकृती वा काम आणि मानवाने केलेले काम यांत फरक करता आला नाही, तर त्याला 'ट्युरिंग टेस्ट' म्हणतात. 'कोबॉट' या 'इंडस्ट्री ५.०'मधील तंत्रज्ञानात आपण तेथपर्यंत पोहोचलो आहोत. डॉ. जेफ्री हिंटन हे 'ट्युरिंग पुरस्कार' विजेते आहेत.एवढे सामाजिक अस्थैर्य, विध्वंस होणार असेल, तर 'एआय' करायचेच कशाला, असा प्रश्न मनात उद्भवू शकतो. शेवटी ती मानवाचीच निर्मिती आहे. त्याचे उत्तर दडले आहे लोभीपणात.'एआय'मध्ये काम करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या भागधारकांना उत्तम परतावा देऊन स्वतःची तुंबडी भरायची आहे. जगात अस्थैर्य निर्माण होईल वगैरे तात्त्विक गोष्टींत त्यांना रस नसून, त्यांच्यात 'एआय'मधील अग्रणी होण्याची उघडी-नागडी स्पर्धा आहे, हे निःसंशय.या स्पर्धेत आपण टिकून राहण्यासाठी शिक्षणपद्धतीत शिक्षकांनी 'गूगल' व्हावे आणि विद्यार्थ्यांनी 'चॅट जीपीटी'. म्हणजेच शिक्षकांनी 'गूगल'पलीकडचे ज्ञान द्यावे आणि विद्यार्थ्यांनी 'चॅट जीपीटी'चा वापर करावा; पण त्यावर पूर्ण अवलंबून न राहता स्वतःचा तरतम भाव वापरावा.या पुढे आपली स्पर्धा 'एआय'शी असणार आहेच; त्याहीपेक्षा ती 'एआय'बरोबर काम करणाऱ्या मानवांशी अधिक असेल.



लेखक
अच्युत गोडबोले

# विजेवर धावणारी लोकल आज शंभर वर्षांची झाली

**विजेवर धावणाऱ्या लोकलचा प्रवास**

1925 - पहिली चार डब्यांची विजेवर चालणारी लोकल हार्बर रेल्वेवर धावली

1927 - पहिली आठ डब्यांची विजेवर चालणारी लोकल मध्य रेल्वेवर आणि हार्बर रेल्वेवर धावली

1928 - पश्चिम रेल्वेवर पहिली विजेवर चालणारी लोकल धावली

1961- पहिली नऊ डब्यांची लोकल मध्य रेल्वेवर धावली 1986 - पहिली बारा डब्यांची लोकल मध्य रेल्वेवर धावली



३ फेब्रुवारी १९२५ या दिवशी कोळशाचे इंजिन सोडून मध्य रेल्वेच्या व्हिक्टोरिया टर्मिनस (आताचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते कुर्ला स्थानक या दरम्यान पहिली उपनगरी रेल्वे विजेवर धावली. वाफेवर चालणाऱ्या इंजिनपासून १५०० व्होल्टेड डीसी प्रणालीवर धावणाऱ्या इंजिनचा चार डब्यांसह प्रवास सुरू झाला आणि भारतीय रेल्वेच्या विद्युतीकरणाला सुरुवात झाली. १९२८पर्यंत हार्बर मार्गावर चार डब्यांची लोकल आणि मुख्य मार्गावर आठ डब्यांची लोकल धावत होती. १९२५ ते २०२५ अशा लोकलच्या शंभर वर्षानिमित्त मुंबईत विविध कार्यक्रमांचे आयोजन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येणार आहे.

भारतीय रेल्वेची पहिली विद्युत रेल्वेगाडी मध्य रेल्वेमार्गावर धावली. मुंबई लोकल सद्यस्थितीत ७७ लाखांहून अधिक प्रवाशांची रोज वाहतूक करत आहे. मुंबई उपनगरी रेल्वेवरील मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील सात मार्गांवरील एकूण ३०० किमी मार्गावर उपनगरी रेल्वे धावती आहे. चार डब्यांचा विस्तार १५ डब्यांपर्यंत करण्यात आला आहे. वातानुकूलित लोकलही धावती आहे. मुंबई लोकलचा विस्तार ४०० किमीपर्यंत करून येत्या पाच वर्षांत ३०० लोकल फेऱ्या वाढवण्याच्या नियोजनाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यानुसार नवीन उपनगरी रेल्वेमार्गाचे काम विविध टप्प्यांत सुरू आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भारतीय रेल्वेने शून्य कार्बन उत्सर्जन ध्येय निश्चित केले आहे. रेल्वेचे विद्युतीकरण हा अभियांत्रिकी प्रगतीतील एक मोलाचा टप्पा आहे. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी रेल्वेचे विद्युतीकरण पूर्ण झाले. यात १५०० व्होल्ट डीसीचे २५,००० व्होल्ट एसी हा वीजबचतीचा अतिशय महत्त्वाचा टप्पा २०१५मध्येच पूर्ण करण्यात आला. रेल्वेने शून्य कार्बन उत्सर्जनाचे ध्येय निश्चित केले असून त्यानुसार विद्युतीकरणानंतर आता हायड्रोजन उर्जेवर धावणाऱ्या इंजिनाकडे पावले टाकण्यात येत आहेत. रेल्वेने स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून हायड्रोजन उर्जेवर धावणाऱ्या १२०० अश्वशक्ती क्षमतेच्या इंजिनाच्या निर्मितीचे नियोजन केले आहे. त्याची चाचणी घेऊन शून्य कार्बन उत्सर्जन ध्येयासाठी महत्त्वाचे पाऊल टाकण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली.

महामुंबईच्या जडणघडणीत मोलाचे योगदान मुंबई उपनगरी रेल्वे अर्थात मुंबई लोकलचे आहे. पहिल्या विद्युत उपनगरी रेल्वेगाडीच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (तेव्हाचे व्हीटी) ते कुर्ला अशा १६ किलोमीटरच्या प्रवासाला येत्या आठवड्यात अर्थात ३ फेब्रुवारीला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. सध्या ३०० किलोमीटर असलेला उपनगरी रेल्वेचा पल्ला शतकोत्तरात ४०० किलोमीटर पार करण्याचे रेल्वे प्रशासनाचे नियोजन आहे.

3 फेब्रुवारी 1925 ला पहिली विजेवर धावणारी लोकल तेव्हाच्या व्हिक्टोरिया टर्मिनस म्हणजेच आताच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून कुर्ल्यापर्यंत हार्बर मार्गावर चालवण्यात आली होती. 3 फेब्रुवारी 1925 रोजी केवळ चार डबे घेऊन ही लोकल धावली होती. तिचा वेग काशी 50 मैल इतका होता. डबे हे लाकडी बनावटीचे होते. त्यात मध्ये लोखंडाचा देखील वापर करण्यात आला होता. मध्य रेल्वेला आधी ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे ही कंपनी चालवायची. याच कंपनीने ही विजेवर धावणारी लोकल चालवली होती. तेव्हाच्या वृत्तपत्रात भारतात एका प्रदूषणरहित नवीन युगाची सुरुवात, अशा मथळयाखाली बातम्या छापून आल्या होत्या. फेब्रुवारी 1925 नंतर अनेक नवनवे तंत्रज्ञान घेऊन लोकल मध्य आणि पश्चिम रेल्वेवर धावू लागल्या. इतकेच नाही तर विजेवर चालणारे इंजिन देखील बनवले गेले आणि लांब पल्ल्यांच्या गाड्या विजेवर धावू लागल्या. त्यामुळे कोळसा आणि डिझेल जाळून होणारे प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी व्हायला मदत झाली.

### कल्याणच्या जी प्लस हार्ट रुग्णालयात

# अत्याधुनिक मिनीमल इनव्हेसिव्ह हार्ट सर्जरी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणच्या वैद्यकीय क्षेत्रात अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीत आपला वेगळा ठसा उमटवलेल्या जी प्लस हार्ट सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये अतिशय परिणामकारक आणि अत्याधुनिक समजली जाणारी "मिनीमल इनव्हेसिव्ह हार्ट सर्जरी" यशस्वीपणे करण्यात आली आहे. इतकी अवघड शस्त्रक्रिया यशस्वीपणे होणारे जी प्लस ठाणे पलिकडील पहिले रुग्णालय ठरल्याने इथल्या डॉक्टर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले जात आहे.

चालताना धाप लागत असल्याने खोपोली येथे राहणाऱ्या कविता हजारे (वय ४० वर्षे)या तीन दिवसांपूर्वी कल्याणातील जी प्लस हार्ट रुग्णालयात आल्या. या रुग्णालयाचे हृदयविकार तज्ज्ञ डॉ. अमोल चव्हाण यांच्याकडून त्यांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. हृदयाच्या या तपासण्यांमध्ये डॉ. चव्हाण यांना काहीशी अनियमितता दिसून आली. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिनीची झडप योग्य पद्धतीने कार्यरत नसल्याचे या तपासण्यांमध्ये आढळून आले. तर कविता यांचे कमी असणारे वय पाहता ओपन हार्ट सर्जरीऐवजी नवी आणि परिणामकारक पद्धती म्हणून उदयास आलेल्या मिनीमल इनव्हेसिव्ह हार्ट सर्जरी करण्याचा सल्ला डॉ. अमोल चव्हाण यांनी त्यांच्या कुटुंबीयांना दिला. आणि त्यांच्या कुटुंबियांनीही डॉ. चव्हाण यांच्यावर पूर्णपणे विश्वास दाखवत या नव्या आधुनिक उपचार पद्धतीसाठी मान्यता दिली.

सायन रुग्णालयातील सुप्रसिद्ध हृदयरोग शल्य विशारद डॉ. वैभव शहा यांनी आपल्या इतर सहकाऱ्यांच्या साथीने जी प्लस रुग्णालयात ही मिनीमल इनव्हेसिव्ह हार्ट सर्जरी यशस्वीपणे करत कविता यांना पुढील धोक्यातून सुखरूप बाहेर काढले. तब्बल 8 तास चाललेली ही शस्त्रक्रिया डॉ. शहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक प्रयत्नांनी यशस्वी करून दाखवली. विशेष म्हणजे ही शस्त्रक्रिया झाल्यानंतर लगेचच कविता यांच्या तब्येतीत अतिशय चांगली सुधारणा दिसू लागली आहे. अशा प्रकारची आधुनिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे करणारे जी प्लस हार्ट हे ठाणेपलीकडील पहिलेच रुग्णालय ठरले असल्याची माहिती हृदयविकार तज्ज्ञ डॉ अमोल चव्हाण यांनी दिली आहे.

जुन्या ओपन हार्ट सर्जरीमध्ये रुग्णाच्या शरीरावर मानेच्या खालच्या भागापासून ते पोटापर्यंतचा भागाला काप द्यावा लागतो. ज्यामुळे शरीरावर अधिक मोठी जखम होऊन रुग्ण बरा होण्यासही बराच कालावधी लागतो. तर मिनिमल इनव्हेसिव्ह सर्जरीमध्ये अत्यंत कमी भागात काप देऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. यामध्ये ओपन हार्टपेक्षा लहान जखम असल्याने रुग्ण लवकर बरा होतो. विशेष म्हणजे कमी वय असणाऱ्या रुग्णांच्या भवितव्याचा विचार करता जगभरात ही नवी आणि परिणामकारक शस्त्रक्रिया चांगलीच पाय रोवू लागल्याची माहिती हृदयरोग शल्य विशारद डॉ. वैभव शहा यांनी दिली आहे.

### मावळी मंडळ विभागीय खो-खो स्पर्धेत

## ज्ञानविकास व विहंग संघाची बाजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रतिनिधी श्री मावळी मंडळ संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त दि.31 जानेवारी ते 01 फेब्रुवारी 2025 रोजी आयोजित केलेल्या प्रथम विभागीय खो-खो स्पर्धेच्या महिला गटात ज्ञानविकास फॉउंडेशन संघ (ठाणे) व पुरुष गटात विहंग क्रीडा केंद्र (ठाणे) या संघानी अंतिम विजेतेपद पटकावले. महिला गटातील अंतिम सामन्यात ठाण्याच्या ज्ञानविकास फॉउंडेशन संघाने नाणेफेक जिंकून संरक्षणाची निवड केली. ज्ञानविकास फॉउंडेशन संघाने ठाण्याच्या रा.फ.नाईक संघावर १०-०८ असा २ गुण व १:१० मिनिटे राखून विजय मिळविला. तर पुरुष गटातील अंतिम सामन्यात ठाण्याच्या विहंग क्रीडा केंद्र संघाने नाणेफेक जिंकून संरक्षणाची निवड केली. विहंग क्रीडा केंद्र संघाने मुंबई उपनगरच्या शिर्सेकर्ल महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडेमी संघावर १५-१० असा ०५ गुणांनी विजय मिळविला. विजयी संघांना प्रमुख पाहुणे मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश उमेश साळवी यांच्या शुभहस्ते व संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष सुनील करंजकर , चिटणीस रमण गोरे, सहाय्यक चिटणीस चिंतामणी पाटील, खजिनदार रिक्सन फर्नांडीस, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विश्वस्त पॅट्रिक फर्नांडीस, विश्वस्त रवींद्र आंग्रे, विशवस्त केशव मुकणे यांचे उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले.

# ठाण्यात मोफत आरोग्य महायज्ञ शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रतिनिधीउपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वाढदिवसानिमित्त शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व माजी नगरसेवक, मा.शिवसेना गटनेते दिलीप बारटक्के यांचे वतीने दि.03 ते दि.06 फेब्रुवारी 2025 या कालावधीमध्ये ठाणे महानगरपालिका शाळा क्र.120, स्वा. सावरकर नगर, ठाणे येथे सकाळी 10 ते सायंकाळी 05 या वेळेत आरोग्य महायज्ञ शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जेष्ठ नागरिकांसाठी मोफत फिजिओथेरपी केली जाणार आहे. तसेच कुटुंबाचा प्रमुख कणा म्हणजे अर्थातच पुरुषा इतकीच महत्त्वाची स्त्री. स्त्री स्वतःच्या आरोग्याकडे फार कमी वेळा गांभीर्याने बघते. तिने स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यायला हवी. विशेषतः चाळीशी नंतर तर घ्यायलाच हवी. सध्या कॅन्सरचं प्रमाण किती झपाट्याने वाढत आहे हे आपण आजूबाजूला बघतो आहोत ऐकतो आहोत. आणि म्हणूनच सातत्याने स्वतःच्या गर्भाशयाची तपासणी, ब्रेस्ट तपासणी करून घेणं अत्यावश्यक आहे. सगळ्यांनाच कॅन्सर होतो असं नाही. पण आपल्या डोक्यावरचा आजाराचा भार त्याचं भय, तपासणी केल्यानंतर कमी होतं. आणि समजा दुर्दैवाने प्राथमिक सुरुवात असेल तर त्वरित निदान होतं आणि कॅन्सर पासून आपली मुक्तता होऊ शकते. कॅन्सरच्या तपासण्या अतिशय महाग असतात. या शिबीरामध्ये दि.06 फेब्रुवारी 2025 रोजी महिलांसाठी मोफत "मेमोग्राफी (ब्रेस्ट कॅन्सर)" चेकअप केले जाणार आहे. तरी सर्वांनी या शिबीराचा आवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन मा.शिवसेना गटनेते, मा. नगरसेवक दिलीप चंद्रकांत बारटक्के यांनी केले आहे.



सोमवार
3 फेब्रुवारी २०२५

**मेष**
आरोग्याच्या दृष्टीने निरोगी वाटेल. तुमच्या मेहनतीचे फळ तुम्हाला नक्कीच मिळेल.

**वृषभ**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. मुलांकडून चांगली बातमी मिळेल. उधारी-कर्ज घेऊ नका.

**मिथुन**
आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. दिवसाचा अधिक वेळ प्रवासात घालवू शकता.

**कर्क**
आर्थिक बाबतीत लाभ होईल. भविष्य सुधारण्यासाठी तुम्ही नवीन पावले उचलाल

**सिंह**
कुटुंबातील सर्व सदस्य होतील. शिक्षकांचे सहकार्य मिळेल. महत्त्वाकांक्षाही वाढू शकतात.

**कन्या**
कुटुंबियांसोबत वेळ घालवाल. अचानक काही मोठा आर्थिक लाभ होईल. समाधान मिळेल.

**तुळ**
आज तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न कराल. शिक्षकांचे सहकार्य मिळेल.

**वृश्चिक**
मेहनतीने केलेल्या कामात यश मिळेल. विद्यार्थ्यांना नव्या प्रकल्पावर कामाची संधी मिळेल. जीवनात

**धनु**
आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.आजचा दिवस चांगला जाईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मकर**
येत्या काळात तुमच्या बोलण्याने सगळे प्रभावित होतील. लवकरच नवीन जबाबदाऱ्या मिळतील.

**कुंभ**
सुख मिळेल. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली सरकारी कामे आज पूर्ण होतील.

**मीन**
चांगले काम करण्याचा प्रयत्न कराल. सर्वांचे पूर्ण सहकार्य मिळाल्याने समाधानी दिसाल.

# रनर्स क्लॅन फाऊंडेशनची 'एक दौड वीर जवानों के लिए'

### जवानांसाठी ३०० धावपटूंची गेट वे ऑफ इंडिया ते डोंबिवली विक्रमी धाव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

- रनर्स क्लॅन फाऊंडेशन आयोजित 'एक दौड वीर जवानों के लिए 'ही अर्बन अल्ट्रा दौड रविवार दि. ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी उत्साहात संपन्न झाली. ही दौड तीन प्रकारात खेळविली गेली. ६५ किमी अर्बन अल्ट्रा दौड, ३५ किमी कॉन्फीडन्स दौड व १५ किमी इन्स्पायरींग दौड या तीन अंतरासाठी जवळजवळ ३०० धावपटुंनी सहभाग घेतला. ०२ फेब्रुवारी रात्री ठिक ००:००वा. सहाय्यक पोलिस आयुक्त एस. काशिद आणी डि.बी.जाधव ग्रुपचे संस्थापक मच्छिंद्र जाधव तसेच लेफ्टनन्ट कमांडर नौसेना (निवृत्त) बिजय नायर यांनी दौडला हिरवा कंदिल दाखला. त्यानंतर दौड मंत्रालय, नरीमन पॉईंट, मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, चेंबूर नाका, वाशी ब्रिज, पाईपलाईन रोड, शिळफाटा, कॅ.शहीद विजय सच्चान स्मारक, डोंबिवली पश्चिम आणी शेवटी नेहरू मैदान डोंबिवली पूर्व येथे सकाळी दौडची सांगता झाली.

सांगता सोहळयासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले आमदार रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते सर्व धावपटुंच्या गट कप्तानांना सन्मानचिन्ह देण्यात आले.तसेच यावेळी मरणोपरांत सेना मेडल मिळविलेल्या शहीद जवान जोतिबा गणपती चौगुले यांच्या वडीलांचा सत्कार सन्मानचिन्ह आणी धनादेश देऊन करण्यात आला. आपले हे समाजकार्य असेच पुढे निरंतर चालत राहो अशा शुभेच्छा आमदार रविंद्र चव्हाण यांनी आयोजकांना दिल्या. त्यानंतर आपल्या आभारपर भाषणात फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण गुंडप यांनी सर्व प्रायोजकांचे, प्रमुख पाहुण्यांचे आणी दौडसाठी मेहनत घेतलेले विश्वस्त मुकुंद कुलथे ,दौडचे प्रकल्प प्रमुख विश्वस्त गिरीश लोखंडे यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन झुंबाच्या रंजना गुप्ता आणी विश्वस्त नितीन कुवर यांनी केले.

# ठाणे रेल्वे स्थानक परिसरात टायर किलर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे रेल्वे स्थानक परिसरात विरुद्ध दिशेने होणारी वाहतुक रोखण्यासाठी ठाणे वाहतुक पोलीस आणि ठाणे महापालिकेने टायर किलर बसविले आहे. प्रायोगिक तत्त्वावर हे टायर किलर बसविण्यात आले असून हा प्रयोग यशस्वी ठरल्यास शहरातील इतर मार्गिकांवरही टायर किलर बसविले जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील वाहतुक सुरळीत राहावी यासाठी काही भागात एक दिशा मार्गिका केल्या आहेत. असे असले तरी या मार्गिकांवर वाहतुक पोलीस नसल्यास काही वाहन चालक विशेषत: रिक्षा चालक विरुद्ध दिशेने वाहने चालवून या मार्गिकांमध्ये प्रवेश करत असतात. त्यामुळे वाहतुक अडथळा होऊन कोंडी होत असते. विरुद्ध दिशेने वाहने चालविल्यास गंभीर अपघाताची शक्यता निर्माण होते. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलीस आणि ठाणे महापालिकेने या मार्गांवर टायर किलर बसविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, रविवारी येथील छत्रपती शिवाजी महाराज पथ परिसरात ठाणे रेल्वे स्थानक येथून मो.ह. विद्यालयाच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या मार्गिकेवर टायर किलर बसविण्यात आले आहे. हे टायर किलर प्रायोगिक तत्तवावर बसविण्यात आले आहे. टायर किलरमुळे विरुद्ध दिशेने होणाऱ्या वाहतुकीला आळा बसणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# भिवंडीतून सायबर गुन्हे करणारी टोळी गजाआड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सायबर गुन्हे करून पोलिसांच्या तावडीत सापडू नये यासाठी फसवणूकीचे पैसे बेरोजगार, अशिक्षितांच्या खात्यात वळवून पुन्हा ती रक्कम आपल्या खात्यात वळते करणाऱ्या एका टोळीला शांतीनगर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत तिघांना अटक केली आहे. तर दोन अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अवघ्या महिन्याभरात त्यांनी नागरिकांची ३५ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. फसवणूकीची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता असल्याने याप्रकरणाचा तपास शांतीनगर पोलिसांकडून सुरू आहे.

अब्दुल अन्सारी (२३), आतिक अन्सारी (२०) आणि मोहम्मद अन्सारी (२०) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे असून १७ वर्षीय दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून १२ मोबाईल, वेगवेगळ्या बँक खात्याचे १२ डेबिट कार्ड, १७ धनादेश, बँक खातेपुस्तिका आणि पॅनकार्ड पोलिसांनी जप्त केले आहे. भिवंडीतील फातमानगर परिसरातील एका घरामध्ये बसून टोळी नागरिकांची ऑनलाईन फसवणूक करत असल्याची माहिती शांतीनगर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, शांतीनगर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून अब्दुल, आतिक, मोहम्मद यांच्यासह पाच जणांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्यांच्याकडून जप्त केलेल्या मोबाईल आणि बँक खात्याच्या माहिती घेतली. त्यानंतर पोलिसांनी राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल (एनसीसीआरपी) या संकेतस्थळावरील माहिती तपासली असता, फसणूकीची रक्कम ते बिहार, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू येथील नागरिकांच्या बँक खात्यात पाठवित होते. हे पैसे ही टोळी डेबिट कार्ड किंवा धनादेशाद्वारे त्यांच्या मोऱ्हक्याच्या खात्यात वळते करत होते. त्या मोबदल्यात तो मोऱ्हक्या यातील काही रक्कम पाच जणांना पाठवित असे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# क्लस्टरचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक

## आमदार जितेंद्र आव्हाड यांचा आरोप



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शहरात एकही क्लस्टर योजना यशस्वी होताना दिसत नसून शहरात केवळ क्लस्टरच्या नावाने दादागिरी सुरू आहे. काही लोकप्रतिनिधी क्लस्टर योजनेचे आमिष दाखवून नागरिकांना फसवत असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी पत्रकार परिषदेते केला. ठाणे महापालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्यात नियोजित रस्त्यासाठी कळव्यातील ४० अधिकृत इमारतींवर बुलडोजर फिरण्याची शक्यता आहे. यासंदर्भात, राष्ट्रवादी (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषद घेतली होती. यादरम्यान, त्यांनी मराठी माणसाला उध्वस्त करणारा नियोजित विकास आराखडा रद्द करावा अशी मागणी केली असून सर्व रहिवाशांसह याविरोधात संघर्ष करण्याची भूमिका घेतली आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले, क्लस्टर योजनेच्या नावाखाली केवळ ठाण्यात दादागिरी सुरु असून नागरिकांची फसवणूक होत आहे. पुढच्याच्या पुढच्या पिढीला क्लस्टरमध्ये घर मिळणार असेल तर, त्या योजनेचा काय फायदा असा सवाल आव्हाड यांनी उपस्थित केला.

घरे विकत घेणे परवडत नसल्यामुळे एकीकडे ठाणे, मुंबईमधील मराठी माणूस बाहेर जात आहे, या मराठी माणसाला पुन्हा ठाणे, मुंबईत आणण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. परंतू, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत ठाणे महापालिकेने शहराचा नवीन विकास आराखडा प्रसिद्ध केला. हा विकास आराखडा शहरातील अनेक प्रभागांना उध्वस्त करणारा असल्याचे समजताच हा विकास आराखडा आता, वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कळव्यातील सुदामा, त्रिमूर्ती, एनएम सोसायटी आणि सह्याद्री या अधिकृत इमारतीच्या परिसरातून रस्त्याचे आरक्षण या विकास आराखड्यात टाकले आहे. त्यामुळे या विकास आराखड्याला येथील नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे. गेली अनेक वर्षांपासून या परिसरात मराठी माणूस अस्तित्व टिकवून आहे. या सर्व सोसायटी अधिकृत असून मूठभर बिल्डारासाठी कळवा उध्वस्त करण्याचा डाव आखला जात असल्याचा आरोप यावेळी स्थानिक नागरिकांनी केला. तर, नवीन विकास आराखडा बनवताना कोणत्याही प्रकारे अभ्यास करण्यात आलेला नाही. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत निष्काळजीपणाने हा विकास आराखडा बनवला असल्याचा आरोपही आव्हाड यांनी केला.

कळव्यातील जय त्रिमूर्ती सोसायटीची जागा बळकवण्यात आली असून त्या ठिकाणी बेकायदा व्यायामशाळा उभारण्यात आली आहे. ही व्यायामशाळेवर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने देऊनही पालिका प्रशासन कोणतीही कारवाई करत नाही.

या भागातील स्थानिक नागरिकांनी वारंवार पालिका आयुक्तांना पत्रव्यवहार करून देखील बेकायदा व्यायामशाळा तोडण्यात येत नाही. यावर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संताप व्यक्त करत, आयुक्त सौरभ राव यांनी पालिकेचे आयुक्त म्हणून काम करावे. एका राजकीय पक्षाचे प्रतिनिधी म्हणून काम करू नये असा सल्ला दिला.

# गृहनिर्माण संस्थांच्या आवारात ई-चार्जिंग स्टेशन

## धोरणाची अंमलबाजवणी करण्याचे न्यायालयाचे आदेश






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गृहनिर्माण संस्थांच्या आवारात इलेक्ट्रिक वाहनांसाठी ई-चार्जिंग स्टेशन्स उपलब्ध केल्यास वायू प्रदूषणाचा धोका कमी होण्यास मदत होईल, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले. तसेच, गृहनिर्माण संस्थांमध्ये चार्जिंग पॉइंट्स/स्टेशन्स उपलब्ध करण्याबाबतच्या धोरणाला लवकरात लवकर अंतिम स्वरूप देऊन ते अमलात आणा, असे आदेशही राज्य सरकारला दिले.

संस्थांकडे अनेकदा निवेदन देऊन तसेच संपर्क साधून चार्जिंग स्टेशन आवारात उपलब्ध करण्याची परवानगी देण्यात आली नाही. त्यामुळे पेडर रोडस्थित व्यावसायिकाने त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या व्यावसायिकाच्या याचिकेच्या निमित्ताने न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश दिले. याचिकेत उपस्थित केलेले मुद्दे हे केवळ ऑटोमोबाइल क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे नाहीत. तर प्रदूषण कमी करणारे ई-वाहनांचे सकारात्मक परिणामही अधोरेखित करतात. सद्या:स्थितीला संस्थांत इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उपलब्ध करण्याची आवश्यकता असून त्यामुळे हवा प्रदूषणाचा धोका कमी होण्यास मदत होईल, असेही खंडपीठाने आदेशात नमूद केले.

### ‘कायद्यानुसार मसुदा अटी अंतिम करा’

न्यायालय धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करू शकत नाही, तथापि, स्वच्छ, प्रदूषणरहित वातावरण असणे हा पैलू भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांचा अविभाज्य असून तो अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे गृहनिर्माण संस्थेच्या योग्य व्यवस्थापनाशी संबंधित मुद्द्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था (एमसीएस) कायद्यानुसार मसुदा अटी अंतिम करणे आवश्यक आहे.

याबाबत राज्याच्या संबंधित विभागाने मसुदा अटी तयार केल्या आहेत. त्यात आवारात असे चार्जिंग पॉइंट्स उपलब्ध करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यक्तींसाठी तरतूद आहे. ई-वाहनांसाठी गृहनिर्माण संस्थांत अशा चार्जिंग स्टेशन उपलब्ध करण्याच्या आधुनिक दैनंदिन गरजांची महापालिकेसह संबंधित विभागांचे अधिकारीही जागरूक आहेत. चार्जिंग पॉइंट्सची मागणी वाढत असून भविष्यात ती आणखी वाढणार आहे, असे न्यायालयाने आदेशात म्हटले.

# फळांचा राजा बाजारात दाखल

## वाशीच्या एपीएमसी बाजारात हापूस आंब्याच्या १७५ पेट्या विक्रीसाठी दाखल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : वाशीच्या एपीएमसी बाजारात शनिवारी कोकणातील हापूस आंब्याच्या तब्बल १७५ पेट्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत . गेल्या काही दिवसांपासून बाजारात तुरळक पेट्या दाखल होत होत्या. परंतु आज शनिवारी यंदाच्या हंगामातील हापूसची अधिक आवक झाली आहे. बाजारात आंब्याची ही आतापर्यंतची चांगली आवक आहे . यावर्षी हापुसचे उत्पादन चांगले असेल, मात्र हंगामाला उशिराने सुरुवात होईल असे मत हापूस बागायतदार यांच्याकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरवर्षी हापूस आंब्याचा खरा हंगाम मार्च महिन्यात सुरू होतो. यंदा हवामान बदल, कडाक्याची थंडी यामुळे सुरुवातीचा मोहोरला फाळधारणा झाली नाही तर काही मोहोर गळून पडला. थ्रीप्स रोगाच्या प्रादुर्भावाचा ही फटका बसला त्यामुळे, औषधीफवारणी खर्च वाढला. त्यामुळे बाजारात सध्या फेब्रुवारी महिना उजडला तरी हापूसची आवक कमी होत आहे. त्यामुळे खवय्यांना हापूसची चव चाखण्यासाठी १५ मार्चपर्यंत वाट पहावी लागणार आहे. मागील आठवड्यात हापूसच्या २४पेट्या दाखल झाल्या होत्या तेव्हा १०-१५हजार रुपयांनी पेटीची विक्री झाली आहे.आज शनिवारी दाखल झालेल्या हापूसच्या ऐका पेटीतील ४ ते ६ डझनला ७ हजार ते १२ हजार रुपये बाजारभावाने विक्री झाले आहे.

> “ शनिवारी एपीएमसीत हापूसच्या १७५ पेट्या दाखल झाल्या आहेत. यंदाच्या हंगामातला आत्तापर्यंतची अधिक आवक झाली आहे. मार्चमध्ये मोठ्या प्रमाणावर हापूस दाखल होण्यास सुरुवात होईल. सध्या बाजारात हापूस ४ ते ६ डझनाच्या पेटीला ७ ते १२ हजार रुपये दराने विक्री होत आहे.
>
> संजय पानसरे, संचालक, फळबाजार समिती

# उल्हासनगर महापालिकेच्या जनसंपर्क अधिकारी पदी अजय साबळे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : अजय साबळे हे दक्षिण सोलापूर मधील असून त्यांनी MIT मधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन मध्ये पदवी प्राप्त केली असून मास्टर इन सोशल वर्क मध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागात तलाठी पदाचा अनुभव असलेले अजय साबळे हे प्रतिनियुक्तीवर उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत रुजू झाले आहेत. त्यांनी 2017 साली महसूल विभागातून परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यांची पहिली नियुक्ती ही तलाठी या पदावर नाशिक मध्ये झाली होती. इथे असतानाच अजय साबळे यांना एमपीएससी मार्फत पोलीस उपनिरीक्षक पदासाठी ट्रेनिंगला बोलावण्यात आले होते.

मात्र त्याचवेळी त्यांची नांदेड मध्ये परिविक्षाधीन मुख्याधिकारी पदावर नियुक्ती झाल्याने त्यांनी उपनिरीक्षक पद टाळून मुख्याधिकारी पद स्वीकारले. त्यानंतर अजय साबळे यांनी गडचिरोली व पालघर सारख्या आदिवासी दुर्गम भागामध्ये मध्ये मुख्याधिकारी पदाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडल्यावर त्यांची सप्टेंबर मध्ये प्रतिनियुक्तीवर उल्हासनगर महानगरपालिकेत बदली झाली आहे. त्यांनी 142 कल्याण पूर्व मध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उत्कृष्ट्या जबाबदारी पार पडल्यामुळे त्यांना जिल्हाधिकारी यांनी प्रमाणपत्र देऊन सन्मानित सुद्धा केले आहे. पालिकेमध्ये त्यांची उपायुक्त पदावर नेमणूक करण्यात आली असून आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी त्यांचा प्रशासनातला अनुभव विचारात घेऊन त्यांना जनसंपर्क अधिकारी या पदाची सुद्धा जबाबदारी देखील सोपवली आहे.

# बेरिंग तुटल्याने वसई - वज्रेश्वरी मार्गावर धावत्या एसटीचे चाक निखळले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : वसई पूर्वेच्या वज्रेश्वरी-वसई या दरम्यान धावत्या एसटी बसचे अचानक चाक निखळल्याची घटना घडली आहे. या बस मध्ये ३० प्रवासी प्रवास करीत होते. सुदैवाने बसचालकाने प्रसंगावधान राखत बस नियंत्रित केली त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. ही घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून त्याची चित्रफीत समाज माध्यमावर प्रसारित होत आहे. वसई पूर्वेच्या ग्रामीण भागात एसटी महामंडळाच्या बस द्वारे सेवा दिली जाते. शनिवारी दुपारच्या सुमारास एसटी बस वज्रेश्वरीहून वसईकडे प्रवाशांना घेऊन निघाली होती. पारोळ गावा जवळ पोहचताच अचानकपणे पुढील बाजूने चाक निखळले. चाक निखळल्याने बस डळमळू लागली आणि प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही क्षणांसाठी बसचे नियंत्रण सुटून अपघात घडेल की काय अशी भीती प्रवाशांमध्ये निर्माण झाली होती. मात्र बस चालकाने तातडीने बस थांबवत सर्वांना सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हा प्रकार घडला तो मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या अगदी काही किलोमीटर अंतरावर होता. जर ही घटना महामार्गावर भरधाव वेगाने घडली असती, तर मोठा अपघात घडण्याची शक्यता होती असे नागरिकांनी सांगितले आहे. या घटनेनंतर प्रवाशांनी एसटी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जुन्या व धोकादायक बस हटवून नव्या आणि सुरक्षित बसगाड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात असेही प्रवाशांनी यावेळी सांगितले आहे. यापूर्वी २५ जुलै २०२४ रोजी वसई अर्नाळा मार्गावर प्रवास करताना वाघोली येथे ही एसटीचे चाक निखळल्याची घटना घडली होती.

वसई वज्रेश्वरी मार्गावर घडलेल्या घटनेनंतर एसटी मंडळाच्या तांत्रिक अधिकारी यांच्या मार्फत सदर घटनेचा तपास करण्यात आला आहे. बस ची बेरिंग तुटल्याने चाक निघाले असल्याची माहिती पालघर जिल्हा विभाग नियंत्रक कैलास पाटील यांनी सांगितले. चालकाच्या प्रसंगावधानामुळे कोणतेही जिवीतहानी झाली नाही असेही त्यांनी सांगितले आहे.

# आलिशान गाडीच्या अपघातात मुंबई विमानतळावर पाच जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता - मुंबई : नेहमीच वर्दळीच्या असणाऱ्या मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर म्हणजेच ‘टर्मिनल २’च्या वाहनतळावर ‘मर्सिडीज बेंज’ या आलिशान कारचा रविवारी सकाळी विचित्र अपघात झाला. मर्सिडीज कारच्या धडकेत दोन परदेशी नागरिकांसह पाच जण जखमी झाले. याप्रकरणी पोलिसांकडून चालकाला अटक करण्यात आली असून गाडी ताब्यात घेऊन अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, पाच जखमींमध्ये दोन परदेशी नागरिकांना नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर विमानतळावरील तीन जखमी कर्मचाऱ्यांवर कूपर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# फी भरली नाही म्हणून पाच वर्षांच्या विद्यार्थ्याला चार तास डांबले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबईतील सिवूड येथील ओर्चीड इंटरनॅशनल शाळेत एक धक्कादायक प्रकार घडला आहे. शाळेची पूर्ण फी भरली असताना देखील शाळेच्या तांत्रिक चुकीमुळे फी न भरल्याचे कारण पुढे करत एका पाच वर्षीय चिमुकल्या विद्यार्थ्याला 4 तास शाळेतील डे केअर सेंटर मध्ये डांबून ठेवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याविषयी पालकांनी जाब विचारत शाळे विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी पोलीसांनी ओर्चीड शाळेच्या मुख्याध्यापिका आणि महिला कोऑर्डीनेटर विरोधात विद्यार्थ्याला क्रूरतेची वागणूक दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवी मुंबईत एका शाळेने फी न भरल्याबद्दल 5 वर्षांच्या मुलांना काही तासांसाठी ताब्यात ठेवले. पोलिसांना हे प्रकरण कळताच, शाळेतील दोन कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मुलाच्या वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. गुरुवारी एनआरआय सागर पोलिस स्टेशनमध्ये बाल न्याय कायदा 2015 अंतर्गत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# पुणे येथे मराठी भाषा विभाग आयोजित तिसरे विश्व मराठी संमेलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पुण्यात तिसरे विश्व मराठी संमेलन आज पार पडले. हे विश्व मराठी संमेलन मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. आज या संमेलनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्यासह आदी दिग्गज उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे यांनी मराठी भाषेसह विविध विषयांवर भाष्य केलं. राज्य सरकारने आणि आम्ही-तुम्ही सर्वांनी आपली मराठी भाषा टिकवली पाहिजे, असं आवाहनही राज ठाकरे यांनी केलं. याच कार्यक्रमात राज ठाकरे यांनी एक विधान केलं. ‘अभिनेत्यांना पुरस्कार मिळतो, पण आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो’, असं म्हणत राज ठाकरे यांनी तुफान फटकेबाजी केली.

राज ठाकरे काय म्हणाले?

“तुमच्या मनात आलं असेल की मी या ठिकाणी कसा? हा शासनाचा कार्यक्रम आहे. पण मला उदय सामंत यांनी या कार्यक्रमासाठी बोलावलं. त्यामुळे मला तुमचं सर्वांचं दर्शन झालं. त्यासाठी मी उदय सामंत यांचे आभार मानतो. माझे मित्र अभिनेता रितेश देशमुख यांना माझ्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. हे सर्व भाग्यवान माणसं, मी पुरस्कार दिला म्हणून नाही. पण यांना (अभिनेत्यांना) पुरस्कार मिळतात आणि आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो. तिरस्कार घेऊन आम्हाला पुढे वाटचाल करावी लागते. मराठी भाषेसाठी आपल्याला खूप गोष्टी कराव्या लागतील. सयाजी शिंदे यांनी आता सांगितलं की त्यांनी आफ्रिकेतील व्यक्तीशी मराठीत कसं भांडण केलं. आपण आपल्या भाषेवर नेहमी ठाम राहिलं पाहिजे. कारण जग तुम्हाला त्यानंतरच दाद देतं”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

“दुसऱ्या देशातील माणसं हे आपल्या देशाशी आणि भाषेशी खूप प्रामाणिक असतात. मग त्यांचा अभिमान आपल्यालाही वाटायला लागतो की ते त्यांच्या भाषेशी किती प्रामाणिक आहेत. आपल्या देशात सुद्धा स्वत:च्या भाषेशी प्रामाणिक आहेत. आपल्या देशातील दुसरे राज्य जर त्यांच्या भाषेबाबत एवढा अभिमान बाळगून असतील तर आपण दुसऱ्या भाषेत का बोलतो? एकमेकांना भेटल्यानंतर दुसऱ्या भाषेत कशासाठी बोलतो? आता कार्यक्रमात आपल्याकडे राज्यगीत लागलं होतं. जय जय महाराष्ट्र माझा.., मग भारतातील दुसऱ्या राज्यात कोणत्या राज्याचं राज्यगीत आहे?”, असंही राज ठाकरे म्हणाले.

“ज्या हिंद प्रांतावर १२५ वर्ष कोणी राज्य केलं असेल तर ते फक्त मराठ्यांनी केलं. ज्यांनी १२५ वर्ष राज्य केलं, त्या राज्याची जी भाषा आहे ती भाषा आपण जपायची नाही तर कोणी जपायची? आता कार्यक्रमाच्या आधी उदय सामंत यांनी मला सांगितलं की मराठी भाषेसाठी तुम्ही जे सांगतान त्यासाठी आम्ही मदत करू. ते मदत करतील अशी अपेक्षा आहे. मराठी भाषेसाठी जे-जे आम्ही करू त्यासाठीही ते पाठिंबा देतील अशी देखील अपेक्षा आहे. पण तेव्हा आमच्यावर गुन्हे दाखल करू नका. आतापर्यंत आलेला अनुभव आहे. कारण आम्ही जे करत आहोत ते मराठी भाषेसाठी आणि महाराष्ट्रासाठीच करत आहोत”, असंही राज ठाकरे यांनी म्हटलं.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार
03 फेब्रुवारी 2025
jeevandeepvartanews2020@gmail.com



# संजय गांधी उद्यानातही 'बिबट्या सफारी' - पालकमंत्री आशिष शेलार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी शुक्रवारी येथे केली. त्यांनी या उद्यानातील दोन सिंह वर्षभरासाठी दत्तकही घेतले आहेत. शुक्रवारी त्यांनी उद्यानाचा पाहणी दौरा केला. बिबट्यांच्या सफारीसाठी सुमारे ३० हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तर सफारी प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे ५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. उद्यानामध्ये सध्या वाघ व सिंहाच्या दोन सफारी उपलब्ध आहेत.

या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात २० लाख पर्यटक भेट देतात. जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली, तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्राचे उत्पन्न वाढेल, अशी माहिती देऊन मुख्य वनसंरक्षक मल्लिकार्जुन यांनी मंत्र्यांसमोर सादरीकरण केले. याबाबत आढावा घेतल्यानंतर शेलार यांनी बिबट्याची सफारी करण्याच्या सूचना दिल्या. त्यासाठी लागणारा निधी वन खात्याकडून व जिल्हा नियोजन समितीमधून दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले. निधीबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

# नव्या शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तकांतून वह्यांची पाने गायब होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना वह्यांच्या पानांशिवाय मिळणार पुस्तकेपेण( प्रतिनिधी)विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी होण्याच्या सकारात्मक हेतूने दोन शासनाने वर्षांपासून पाठ्यपुस्तकांमध्ये विभाजन करून धड्याचे व कवितेच्या पाठीमागे आवश्यकतेनुसार वहीचे पान जोडले होते.

मात्र, ज्या उद्देशाने ही पाने पुस्तकांमध्ये जोडण्यात आली होती, तो उद्देश सफल न झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे २०२५-२६ या वर्षापासून पूर्वीप्रमाणेच पाठ्यपुस्तके वहीच्या पानांशिवाय उपलब्ध करून देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मार्च २०२३ मध्ये राज्यांमधील शासनाच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्यांची पाने जोडलेली पाठ्यपुस्तके पथदर्शी स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली होती. इयत्ता दुसरी ते आठवीच्या सर्व पाठ्यपुस्तकांसाठी ही योजना लागू करण्यात आली होती. तसेच, दप्तराचे ओझे कमी करण्याच्या दृष्टीने इयत्ता तिसरी ते इयत्ता आठवी या इयत्तांसाठी पाठ्यपुस्तके एकात्मिक स्वरूपात एकूण चार भागांमध्ये विभागून तयार करण्यात आली होती. प्रत्येक धडा व कवितेच्या पाठीमागे वहीची पाने जोडण्यात आली होती.या पृष्ठांवर विद्यार्थ्यांकडून वर्गात शिक्षक शिकवत असताना महत्त्वाच्या मुद्द्यांच्या नोंदी घेणे, जसे शब्दार्थ, महत्त्वाचे सूत्र, महत्त्वाचे संबोधन, महत्त्वाची वाक्य, इत्यादी बाबी अपेक्षित होत्या. यामध्ये शुद्धलेखन नोंदवणे अपेक्षित नव्हते. पाठ्यपुस्तकातील ही पाने माझी नोंद या सदराखाली मुलांनी वापरणे आवश्यक होती. मात्र, या योजनेचा आढावा घेतला असता, पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वहीच्या पानांचा विद्यार्थ्यांकडून शिकविलेल्या घटकांच्या नोंदी घेण्यासाठी अपेक्षेप्रमाणे उपयोग झाल्याचे दिसून आले नाही.

# पनवेल येथील साई विद्यालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : शुभदा पॉलीमर्स प्रॉ. प्रा. लिमिटेड यांचे CSR फंड, प्रमोद झवेरी फाउंडेशन व शुभ स्पर्श टीम यांच्या सहकार्यातून बांधण्यात आलेल्या सार्वजनिक माध्य. व उच्च माध्य. विद्यामंदिर साई, पनवेल येथील नूतन इमारतीचा उदघाटन सोहळा संपन्न झाला. एकूण १२ अद्ययावत वर्गखोल्या व त्यामध्ये संगणक कक्ष, अशा भव्य दिव्य इमारतीचे उदघाटन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी मालतिबेन प्रमोदभाई झवेरी, देवांग प्रमोदभाई झवेरी,फाल्गुनी देवांग झवेरी व परिवार, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे , मुकेश पत्रावाला आणि परिवार, कौशिक झवेरी आणि परिवार, केतन झवेरी व परिवार, मुकेश शहा व परिवार, विकास शहा, तेजस सुरा, शुभदा पॉलीमर्स CSR टीम, शुभ स्पर्श टीम , स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था विभाग प्रमुख यु. एस. गलांडे, माजी विभाग प्रमुख आर ए भोजकर आर. ,तसेच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच, उपसरपंच, पंचक्रोशी ग्रामस्थ, पालक व महिला बचत गट उपस्थित होते. याप्रसंगी स्थानिक स्कुल कमिटी चेयरमन दामोदर विठू मोकल, सर्व स्थानिक स्कुल कमिटी सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक शशिकांत हबळे सरांनी मान्यवरांचे स्वागत केले. ग्रामीण भागातील गोर गरीब, आदिवासी मुलांना शिक्षणाच्या उत्तम सोयी मिळाव्यात व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी ही इमारत बांधण्यात आल्याचे शुभदा पॉलीमर्स प्रॉ. प्रा. लिमिटेडच्या डायरेक्टर फाल्गुनी झवेरी यांनी सांगितले.तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या सोयी मिळाव्यात अशी अपेक्षा अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त करून विद्यार्थी व शिक्षक कसा असावा याबाबत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजनप्रविण राम पाटील यांनी केले व आभार प्रदर्शन सुरेश वळवी सरांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षिका, माजी विद्यार्थी, महिला बचत गट यांनी विशेष सहकार्य केले.

### आगरी युवा सेना युवा प्रमुख राहुल साळवी यांच्या हस्ते

# कळवा येथे महारक्तदान शिबिराचे उद्घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



कळवा: मनीषा एज्युकेशन ट्रस्ट, श्रीमती जानकीबाई रामा साळवी वरिष्ठ महाविद्यालय आणि डॉ. आर. एन. कूपर हॉस्पिटल अँड ब्लड सेंटर, विर्लेपार्ले यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मनीषा एज्युकेशन ट्रस्टचे सचिव व आगरी युवा सेना युवा प्रमुख श्री. राहुलजी प्रदीप साळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

उपस्थित मान्यवरयाप्रसंगी एस. जे. आर. एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सूर्यकांत उंब्रजकर, मनीषा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. एल. टी. चौधरी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वसुंधरा वायदंडे आणि मनीषा विद्यालय - ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. धनंजय पष्टे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.या शिबिराचे आयोजन एन. एस. एस. चे प्रोग्राम ऑफिसर प्रा. सुमित गवरे, प्रा. सभा शेख, प्रा. जय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक यांच्या सहकार्याने यशस्वी करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थी व तसेच परिसरातील नागरिक यांनी रक्तदान करण्यास सहकार्य केले.या रक्तदान शिबिराचा उद्देश समाजाला रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे आणि गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देणे हा होता.शिबिरात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

### जीवनदीप महाविद्यालयात 'स्पंदन'च्या माध्यमातून

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा उत्सव!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



टिटवाळा : स्पंदन 2025 जीवनदीप महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा उत्सव!गोवेली: जीवनदीप शैक्षणिक संस्था कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात BMS विभागाच्या वतीने 'स्पंदन 2025' या भव्य आणि रंगतदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्धाटन संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि सृजनशीलता फुलावी, या उद्देशाने आयोजित या सोहळ्यात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पहायला मिळाला. पोस्टर मेकिंग, PPT प्रेझेंटेशन, वकृत्व स्पर्धा, नो फ्लेम कुकिंग, अ‍ॅडव्हर्टायझिंग, मोनो अ‍ॅक्ट, शार्क टँक, फॅशन शो, सिंगिंग आणि डान्स यांसारख्या विविध स्पर्धांनी संपूर्ण महाविद्यालयाला एका उत्सवमय वातावरणात रंगवले.स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेचा कस लावला. फॅशन शोमध्ये ग्लॅमर आणि क्रिएटिव्हिटी यांचा सुंदर संगम पहायला मिळाला, तर शार्क टँक स्पर्धेत नव्या व्यवसाय संकल्पनांनी परीक्षकांना प्रभावित केले. वकृत्व आणि PPT प्रेझेंटेशनमधून विद्यार्थ्यांनी विचारशक्ती आणि संवादकौशल्य सादर केले, तर सिंगिंग आणि डान्सने संपूर्ण वातावरण आनंदाने भारून टाकले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ. के.बी. कोरे, उपप्राचार्य श्री. हरेंद्र सोष्टे, BMS विभाग प्रमुख आणि कार्यक्रम प्रमुख प्रा. उल्हास गायकर, स्पंदन समन्वयक प्रा. सचिन कांबळे, प्रा. निकिता घोडविंदे, प्रा. डी. एन. जाधव तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.स्पर्धकांना बक्षीस वितरण करून विजेत्यांचा सन्मान करण्यात आला, आणि या भव्य सोहळ्याचा समारोप जल्लोषात करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे आणि प्रा. दिनेश धनगर यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने केले.. तसेच प्रास्ताविक BMS विभाग प्रमुख प्रा. उल्हास गायकर सरांनी केले.स्पंदन 2025 हा केवळ एक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा, त्यांना नव्या उंचीवर नेणारा आणि महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेत भर घालणारा एक अविस्मरणीय सोहळा ठरला!



### विद्यार्थ्यांसाठी लवकरच खुली होणार

# उल्हासनगर मनपाची दुसरी अभ्यासिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर महानगरपालिकेची मनपा शाळा क्रमांक १७ ही सी ब्लॉक, चोपडा कोर्ट जवळील शाळेचे बांधकाम सुरू आहे. शाळेच्या आवारात शंभर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सुसज्ज अभ्यासिका तयार झाली आहे. हि शहरातील भव्य अशी दुसरी अभ्यासिका स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करणार्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होईल.

गतवर्षी या अभ्यासिकेचे भूमिपूजन माननीय खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व स्थानिक आमदार कुमार आयलानी व बालाजी किणीकर यांच्या उपस्थितीत झाले होते. महानगरपालिकेने यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका 2016-17 मध्ये सुरू केली असून या अभ्यासिकेतून शेकडो विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत असून मागील पाच वर्षात शेकडो मुलांनी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवून अभ्यासिकेचे उद्दिष्ट सार्थकी केले आहे.

तत्कालीन आयुक्त मनोहर हिरे व महापौर अपेक्षा पाटील व उपमहापौर पंचशीला पवार व उपायुक्त जमीर लेंगरेकर यांच्या संकल्पनेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका ही अस्तित्वात आली. या अभ्यासिकेसाठी पाठपुरावा मनविसेचे बंडू देशमुख यांनी वेळोवेळी केला होता.

२०२३ मध्ये तत्कालीन आयुक्त अजिज शेख व अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या संकल्पनेतून दुसरी अभ्यासिका साकार होत आहे. यासाठी महानगरपालिकेच्या स्वनिधीतून सुसज्ज इमारत बांधली आहे. विद्यमान आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी शहरातील विकास कामे मिशन मोडवर करण्यासाठी सर्व यंत्रणा युद्ध पातळीवर सक्रिय केलेली आहे. त्यामुळे मागील वर्षात सुरू असलेली अनेक कामे या वर्षात पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. उल्हासनगर हे व्यापारी शहर असून शैक्षणिक केंद्र बनण्यासाठी महानगरपालिका शिक्षण विभागात अमुलाग्र बदल करत असून आदर्श शाळा ही संकल्पना घेऊन मनपाच्या शाळात परिवर्तन आणण्यासाठी आयुक्तांनी विविध उपक्रम सुरू केले आहेत.

# कल्याण शहरात असंघटित कामगारांना मिळणार शिधापत्रिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण शहर परिसरातील ई श्रम पोर्टल वरील नोंदणीकृत स्थलांतरित असंघटित कामगारांना शिधापत्रिका देण्यासाठी शासनाने आदेशित केल्याची माहिती कल्याण शिधावाटप नियंत्रण अधिकारी दत्तात्रय नागरे यांनी दिली आहे.

कामगारांकडे शिधापत्रिका नाहीत अशा कुटुंबीयांना शिधावाटप कार्यालयाकडून शिधापत्रिका नमुना अर्ज या अनुषंगाने वितरित केला जात असून शिधापत्रिका देण्याची विशेष मोहीम राबविण्यात आल्याने असंघटित कामगारांनी या मोहिमेत सहभाग घेऊन अडचण निर्माण झाल्यास कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन शिधावाटप अधिकारी नागरे यांनी केले आहे.

कल्याण शहरी भागातील शिधा वाटप कार्यालयाकडे शासनाने 15 हजार 209 कामगारांच्या नावाची यादी पाठविली आहे. त्यानुसार यादीतील संबंधित कामगारांशी भ्रमणध्वनी करून संपर्क साधला गेला आहे. त्यापैकी 11 हजार 510 कामगारांकडे शिधापत्रिका असल्याचे आढळले आहेत. उर्वरित कामगारांनाही लवकरच शिधापत्रिका देण्याचा प्रयत्न येथे सुरू आहे.

शहरातील जे कामगार ई श्रम पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. अशांना डाक कार्यालयामार्फत शिधापत्रिकेसाठी अर्ज पाठविले होते. मात्र संबंधितांनी शिधावाटप कार्यालयाशी संपर्क साधला नाही. कल्याण शिधावाटप कार्यालयाशी कामगारांनी संपर्क साधून योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन शिधावाटप अधिकारी दत्तात्रय नागरे यांनी कामगार वर्गाला केले आहे.

# केडीएमसी बोधचिन्हाचा गैर वापर करणाऱ्या वाहनांवर कारवाई करा

### महानगरपालिकेचे आरटीओला पत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बोध चिन्हाचा गैर वापर होत असल्याची तक्रार एका जागरूक नागरिकातर्फे करण्यात आली होती. त्या तक्रारीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष जयपाल कांबळे यांनी बोधचिन्हाचा गैर वापर करणा-या खाजगी वाहन चालकांवर कार्रवाई करण्याची मागणी केली होती. कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला होता. आमरण उपोषणाचा इशारा मिळताच मनपाने दखल घेत केडीएमसी प्रशासनाचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी उप प्रादेशिक विभागाला पत्र पाठवून महानगरपालिकेच्या बोधचिन्हाचा गैर वापर करणा-या खाजगी वाहन चालकांवर योग्य ती कारवाई करण्यासाठी सूचित केले आहे. यामुळे आता सर्वांची नजर उप प्रादेशिक परिवहन विभागाकडे लागली आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लांबणीवर गेल्यामुळे मागील चार वर्षा पासून महानगरपालिकेत लोकप्रतिनिधी नाही. पण बहुतांश माजी नगरसेवक आणि नगरसेविका आपल्या खाजगी वाहनावर महानगरपालिकेचे बोध चिन्ह लावून बिनधास्तपणे फिरत असतात. आता महानगरपालिका प्रशासनाकडून आदेश निघाल्या मुळे सर्वांना अनधिकृत रित्या लावलेले बोध चिन्ह काढायला लागते का आगमी काळात दिसेल.

# श्याम पाटील यांच्या निवासस्थानी माघी गणेशोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : काटई गावातील शिवसेना शाखाप्रमुख श्याम पाटील यांच्या निवासस्थानी पाच दिवसाचा माघी गणेश उत्सव साजरा करण्याचे खानदानी परंपरा आहे यंदाच्या वर्षी सुद्धा श्याम पाटील यांच्या निवासस्थानी गणेशोत्सव मोठ्या थाटामाटा भक्ती भावाने साजरा होत येथे आई एकविरा देवी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली. या महागणपतीच्या दर्शनाला गावातील मित्रमंडळी नातेवाईक तसेच काटई गावचे माजी सरपंच, कल्याण ग्रामीणचे शिवसेना तालुकाप्रमुख अर्जुन पाटील, नरेश पाटील कोळखे गावचे कॉंग्रेसचे पदाधिकारी भरत म्हात्रे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे, एकनाथ पाटील यांनी श्याम पाटील यांच्या निवासस्थानी महागणपतीचे दर्शन घेतले

# मुरबाड आदिवासी आश्रमशाळेत दहावीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड तालुक्यातील लोकसेवा शिक्षण संस्था संचालित अनुदानित आश्रम शाळा वाल्हीवरे येथे 1 फेब्रुवारी दुपारी 12 च्या सुमारास एका 10 वी. इयत्तेत शिकणाऱ्या ( जव्हार तालुक्यातील) विद्यार्थ्याने शाळेपासून दूरवर असलेल्या नदीकिनारी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली. घटनेचा तपास स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये सुरू आहे. परंतु आदिवासी विकास विभाग या निवासी शाळेच्या अधीक्षक अणि मुख्याध्यापक यांना 24 तास शाळेतच राहण्याचा पगार देत आहे. या सर्व निवासी मुलांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ही या दोन कर्मचाऱ्यांवर असते. परंतु शाळेतील विद्यार्थी दिवसा शाळेबाहेर जाऊन आत्महत्या करतो तरी शाळेतील अधीक्षक अणि मुख्याध्यापक यांना याची कल्पना का नव्हती ? शाळा निवासी असताना हा विद्यार्थी शाळेबाहेर गेलाच कसा? हे दोन्ही कर्मचारी शाळेत उपस्थित नसल्याची माहिती शाळेतील काही विद्यार्थ्यांना विचारले असता मिळाली. हे कर्मचारी या मुलांना वाऱ्यावर सोडून घरीच मजा मारत होते, शाळेतील सीसी टीव्ही कॅमेरा मध्ये घटना कैद झाली आहे का? या दोन्ही कर्मचाऱ्यांचे पूर्ण दिवसाचे लोकेशन तपासले जाईल का? अधीक्षक अणि मुख्याध्यापक नसताना शाळा चालते कशी.फक्त पगार घेण्यासाठी या कर्मचाऱ्यांना ठेवले आहे का ? या मुलाना उपाशी ठेवले जात आहे का? मुलांना उपाशी ठेवल्यामुळे या विद्यार्थ्याने आत्महत्या तर केली नाही ना? शाळा व्यवस्थापन केवळ अनुदान लाटण्यासाठी गोरगरीब आदिवासींची जिल्ह्याबाहेरील मुले त्यांच्या पालकांना सर्व जबाबदारीचा भरवसा देऊन येथे आणत आहेत काय? या सर्व प्रकाराची प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग शहापूर यांना जाणीव असूनही शाळा प्रशासन अणि व्यवस्थापनाला पाठीशी घालत आहेत. शाळेतील मुले अणि मुली यांना सांभाळण्यासाठी पुरुष अणि स्त्री अधीक्षक असताना या शाळेमधे प्रेमप्रकरणातून ही आत्महत्या तर झाली नाही ना ? या विद्यार्थ्याला शाळेतच मारहाण करून झाडाला लटकून ठेवले तर नाही ना ? असे एक ना अनेक प्रश्न या विद्यार्थ्याच्या मृत्यूमुळे निर्माण झाले आहेत. आदिवासी विकास विभाग या शाळेतील मुलांना वाऱ्यावर सोडून गेलेल्या मुख्याध्यापक, अधीक्षक आणि वर्गशिक्षक यांच्यावर या मृत्यूला जबाबदार असल्याने कारवाई करील का? पोलिस प्रशासन हे शाळा प्रशासन अणि व्यवस्थापन यांच्यावर कारवाई करील काय? या प्रकरणाची विशेष एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी आदिवासी संघटना कडून होत आहे. या शाळेत विद्यार्थ्यांना नियमानुसार जेवण दिले जात नसल्याने शाळेत स्थानिक विद्यार्थी येत नाहीत. त्यामुळे केवळ अनुदान लाटण्यासाठी या शाळेत जिल्ह्याबाहेरील आदिवासी मुले आणली जात आहेत. आदिवासींच्या निधीवर शाळा व्यवस्थापन डल्ला मारत असल्याने शाळेची मान्यता रद्द करून या शाळेचे शासकीय आश्रम शाळेत रूपांतर करण्याची मागणी सुद्धा होत आहे. या शाळेच्या संस्थेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाचे बोगस पटसंख्या असलेले 5 वर्षांचे अंदाजे दीड कोटींचा अनुदान प्रस्ताव आदिवासी विभागाच्या आशीर्वादाने पाठविण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे. आदिवासी विकास मंत्री अणि मुख्यमंत्री यांच्या भूमिकेकडे सर्व आदिवासी समाजाचे लक्ष लागून राहिले आहे.

## वाचक मनोगत



# आर्थिक विकासाला गती देणारा सकारात्मक अर्थसंकल्प

**- कायदेतज्ज्ञ शिरिष देशपांडे, डोंबिवली**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये सरकारने वैयक्तिक आयकर दरांमध्ये कपात करून मध्यमवर्गीयांच्या खर्च करण्याच्या क्षमतेत वाढ केली आहे. या निर्णयामुळे अंदाजे २५-३० दशलक्ष करदाते दरवर्षी सुमारे १,००,००० रुपये वाचवू शकतात, ज्यामुळे वाहन खरेदीसारख्या खर्चांना चालना मिळेल.

कर्करोग उपचारांच्या उपलब्धतेत वाढ करण्यासाठी, पुढील तीन वर्षांत सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कर्करोग केंद्रे स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच, ३६ जीवनावश्यक कर्करोग औषधांवरील सीमाशुल्क माफ केल्यामुळे रुग्णांच्या आर्थिक भारात घट होईल.

बॅटरी निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या मुख्य सामग्रीवरील मूलभूत सीमाशुल्क हटवल्यामुळे देशांतर्गत इलेक्ट्रिक वाहन उत्पादनाला चालना मिळेल आणि भारताच्या हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुलभ होईल.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी, सरकारने तेलबिया लागवड आणि अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना जाहीर केल्या आहेत. या उपक्रमांमुळे देशांतर्गत उत्पादन वाढेल आणि ग्राहकांच्या मागणीत वाढ होईल.

या अर्थसंकल्पातील उपाययोजनांमुळे मध्यमवर्गीयांच्या हातात अधिक पैसा राहील, ज्यामुळे ग्राहकांच्या मागणीत वाढ होईल आणि विविध क्षेत्रांना चालना मिळेल.

एकूणच, अर्थसंकल्प २०२५ मधील या निर्णयांमुळे देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल आणि विविध क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडतील.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८ / ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अ‍ॅड. जयकुमार ए. रिजवानी